# Hutatma Rajguru Mahavidyalaya

Rajgurunagar,Tal. Khed, Dist. Pune

---

## NSS Special Camp Report 2024-25 B017 & BSF084

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यमाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन 06 जानेवारी 2025 रोजी दुपारी बहिरवाडी येथे संपन्न झाले. सदरील शिबिर youth for my Bharat and youth for digital literacy या विषयाच्या माध्यमातून शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिरासाठी अध्यक्ष व उद्घाटक खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ संचालक हिरामण अण्णा सातकर, बाळासाहेब लिंबोरे, विजयदादा वाडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक के. आर. पाचारणे त्याचबरोबर बहिरवाडी गावचे सरपंच सौ. वसुधाताई राक्षे, मा. सभापती अंकुशशेठ राक्षे, मा. जगन्नाथशेठ राक्षे व सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक शारदाताई पवार, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. योगेश वाळुंज डॉ. गणेश धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप, प्रास्ताविक डॉ. किर्ती नितनवरे, आभार डॉ. सुनिता जाधव यांनी केले.

मंगळवार दिनांक 7 जानेवारी 2025 रोजी नियमित कार्यक्रमांतर्गत सकाळी सहा वाजता व्यायाम व योगासने, 07.00 वाजता प्रार्थना, ध्वजवंदन करण्यात आले. 7.30 ते 12.30 दरम्यान ग्रामपंचायत लगतची स्वच्छता करण्यात आली. तसेच

स्वच्छतेबाबत पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. गावात सर्वेक्षण करण्यात आले. दुपारी 3.00 वाजता श्री. अंकुश राक्षे यांनी "मी हाताळलेला कोविड-19" या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. यानंतर ‘‘मुलींचा घटता जन्मदर आणि तरुणांसमोरील विवाहाची समस्या’’ या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. तर 5 ते 6 दरम्यान शिबिर फेरी, गावातील ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेण्यात आल्या. नंतर शारीरिक व बौद्धिक खेळ घेण्यात आले. 08.00 ते 10.00 दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. गायन, नृत्य व काव्यवाचन घेण्यात आले.

बुधवार दिनांक 8 जानेवारी 2025 रोजी नियमित कार्यक्रमांतर्गत सकाळी 06.00 वाजता व्यायाम, योगासने व 07.00 वाजता प्रार्थना आणि ध्वजवंदन करण्यात आले. 07.30 ते 12.30 दरम्यान ग्रामपंचायत, मंदिर आणि आसपासच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. बालविवाह रोखण्यासाठी पथनाट्याचे सादरीकरण करून जनजागृती करण्यात आली. दुपारी एक ते दोन दरम्यान भोजन तर 03.00 वा. माननीय श्री अंबर प्रतापराव टाकळकर यांनी ‘‘डिजिटल आणि आर्थिक साक्षरता’’ या विषयावर मार्गदर्शन केले. तर चार ते पाच दरम्यान "ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था" या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. तर रात्री 08 ते 10 सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भारुड व नाटक सादरीकरण करण्यात आले.

गुरुवार दिनांक 9 जानेवारी 2025 रोजी सकाळी 06.00 वाजता व्यायाम व योगासने, 07.00 वाजता प्रार्थना, ध्वजवंदन करण्यात आले. 08.30 ते 12.30 दरम्यान जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, अंगणवाडी व लगतच्या परिसरात झाडे लावण्यासाठी खड्डे खोदण्यात आले. तर एक ते दोन दरम्यान स्वयंसेवकाचे भोजन तसेच सायबर गुन्हेगारी बाबत जनजागृती करण्यात आली. तर 03.00 वाजता श्री. राजेंद्र सांडभोर यांनी "भारतीय लोकशाही आणि मतदार" या विषयावर मार्गदर्शन केले. व

4 ते 5 दरम्यान "भारत आणि जग" या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. तर 08 ते 10 दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

शुक्रवार दिनांक 10 जानेवारी 2025 रोजी सकाळी 08.00 वाजता बहिरवाडी गावात प्रभात फेरी काढण्यात आली. सदरील प्रभात फेरीच्या माध्यमातून ॲनिमिया व इतर आरोग्याबाबत ग्रामस्थांना शिबिरात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले. तर 09 ते 10 दरम्यान श्रमदानाच्या माध्यमातून झाडांना अळी व कुंपण करण्यात आले. सकाळी 10.00 ते 12.30 दरम्यान गावात आरोग्य तपासणी करण्यात आली. यात ॲनिमिया, टीएफटी, सीबीसी, कॅल्शियम आदी तपासणी ग्रामीण चांडोली रुग्णालयाच्या माध्यमातून करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सविता भावसार आरोग्य सल्लागार यांचे मार्गदर्शन झाले. तर 4 ते 5 दरम्यान वाद-विवाद स्पर्धा घेण्यात आल्या. व रात्री सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

शनिवार दिनांक 11 जानेवारी 2025 रोजी सकाळी रोजच्या प्रमाणे व्यायाम व इतर कार्यक्रम घेण्यात आले. तर 9 ते 12 दरम्यान श्रमदान करण्यात आले. एक ते दोन दरम्यान जेवण, तर तीन ते चार दरम्यान मा. श्री. अविनाश वाघमारे यांचे "सायबर गुन्हेगारी आव्हाने व उपाययोजना" या विषयावर व्याख्यान झाले. तर 4 ते 5 दरम्यान पारंपारिक वेशभूषा व हळदी कुंकाचा कार्यक्रम घेण्यात आला. रात्री आठ ते दहा दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय समोरील सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात पोवाडा, नृत्य वादन, विविध स्पर्धा, गायन, एकपात्री नाटक, काव्यवाचन तसेच प्रादेशिक नृत्य सादर करण्यात आले. या कार्यक्रमास ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला व यानंतर कॅम्प फायरचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक 6 जानेवारी 2025 ते 12 जानेवारी 2025 दरम्यान youth for my Bharat and youth for digital literacy अंतर्गत बहिरवाडी येथे समारोप समारंभ दिनांक 12 जानेवारी 2025 रोजी संपन्न झाला. सदरील कार्यक्रमांतर्गत सात दिवसात राबवलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. गावात घेतलेले विविध उपक्रम व केलेल्या जनजागृती बाबत सरपंच आणि उपसरपंच यांनी स्वयंसेवकांचे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांचे आभार मानले. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे जेष्ठ संचालक मा. हिरामण अण्णा सातकर पाटील, मा. बाळासाहेब सांडभोर, उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सरपंच वसुधाताई राक्षे, श्री. जगन्नाथ शेठ राक्षे, उपसरपंच, ग्रामसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कीर्ती नितनवरे, प्रास्ताविक डॉ. सुनिता जाधव, तर आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

Dr. Shirish S. Pingale
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune

*KTSP Mandal's*

# HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA

Rajguruangar, Tal. Khed, Dist. Pune

NATIONAL SERVICE SCHEME 2024-25

**Special Camp at Bahirwadi 06-01-2025 to 12-01-2025**



Inauguration Function



Inauguration Function




Group Discussion




Cleaning Activity



Lecture by Shri. Ankush Rakshe





Cleaning Activity




Morning Yoga





| | |
|---|---|
| Hon. Shri. Nanasaheb Takalkar | Hon. Shri. Devendraji Buttepatil |
|  |  |
| Medical Checkup camp | Medical Checkup camp |
|  |  |
| PSI Shri. Avinash Waghmare | CA Shri. Ambar Takalkar |
|  |  |
| Cultural Activates | Cultural Activates |